# बृहन्मुंबई महानगरपालिका

## अधिसूचना

क्रमांक: प्रअ/विनि/१०५५६/पुनर्रचना

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हस्तांतरित केलेल्या तीन क्षेत्रांची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २८(४) अन्वये प्रकाशित करणेबाबत.**

(१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्राकरिता, बृहन्मुंबई महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन क्षेत्रामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० अन्वये मुंबई महानगर प्रदेशविकास प्राधिकरण हे विशेष नियोजन प्राधिकरण असून, सदर विशेष नियोजन प्राधिकरणाखालील काही क्षेत्रे वगळण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला होता. त्यानुसार नगरविकास विभागाकडून मुंबई महानगर प्रदेश नियोजन विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतील तीन क्षेत्रे वगळून सदर तीन क्षेत्रे मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन क्षेत्रात समाविष्ट करणेबाबतचे शासन निर्णय तीन अधिसूचनाद्वारे जारी केले होते. सदर तीन क्षेत्रांचे विवरण खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. (१) | क्षेत्रांचे विवरण (२) | राज्य शासनाची अधिसूचना क्रमांक आणि दिनांक (३) | क्षेत्रफळ (हेक्टरमध्ये) (४) | महापलिकेचा विभाग (५) |
|---|---|---|---|---|
| १ | बांद्रा-कुर्ला संकुलाच्या अधिसूचित क्षेत्रामधून मीठी नदी व लालबहादूर शास्त्री मार्ग यामधील क्षेत्र कुर्ला (प). | क्र.टिपीबी/४३१४/१३०/ प्र.क्र.४२/२०१४ नवि-११, दिनांक ३० ऑगस्ट २०१४ | अधिसूचनेनुसार क्षेत्रफळ -२७.३६ हेक्टर विद्यमान भूवापरानुसार व जी.आय.एस. प्रणालीनुसार ३५.१३ हेक्टर | एल |
| २ | बांद्रा-कुर्ला संकुलाच्या अधिसूचित क्षेत्रामधून 'अ' ब्लॉकचे क्षेत्र बांद्रे (प.) | क्र.टिपीबी/४३१४/१४६८/ प्र.क्र.३०/२०१५ नवि-११, दिनांक १८ नोव्हेंबर २०१५. | अधिसूचनेनुसार क्षेत्रफळ ४७.३७ हेक्टर विद्यमान भूवापरानुसार व जी.आय.एस. प्रणालीनुसार ६६.५६ हेक्टर | एच/पश्चिम |
| ३ | ओशिवरा जिल्हा केंद्राच्या अधिसूचित क्षेत्रामधून स्वामी विवेकानंद रस्त्याच्या पश्चिमेकडील क्षेत्र गोरेगाव (प.) | क्र.टिपीबी/४३१३/६५८/ प्र.क्र.११६/२०१४ नवि-११, दिनांक १८ नोव्हेंबर २०१५. | अधिसूचनेमध्ये क्षेत्रफळ नमूद केले नाही. विद्यमान भूवापरानुसार व जी.आय.एस. प्रणालीनुसार ३६.५० हेक्टर | के/पश्चिम आणि पी/दक्षिण |

यापुढे उपरोक्त तीन क्षेत्रे 'सदर तीन क्षेत्रे' म्हणून संबोधण्यात येतील.

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार, -

(अ) बृहन्मुंबई महानगरपालिकेने ठराव क्रमांक ८९४, दिनांक ३० ऑगस्ट २०१६ नुसार उक्त अधिनियमाच्या कलम २३ अनुसार सदर तीन क्षेत्रांचा प्रारुप विकास आराखडा तयार

करण्याच्या उद्देश महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात दिनांक २९ सप्टेंबर २०१६ रोजी प्रसिध्द केला होता.

(ब) उक्त अधिनियमाच्या कलम २५ मधील तरतूदीनुसार सदर तीन क्षेत्रांचा विद्यमान भूवापर नकाशा तयार करण्यात आला व जनतेच्या माहितीकरिता महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर दिनांक२७ मार्च २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता.

ज्याअर्थी सदर तीन क्षेत्रांचा प्रारुप विकास आराखडा व शहर स्तरावर समानता राखण्याच्या दृष्टीने महापालिकेने दिनांक २७ मे २०१६ च्या ठराव क्र.३०७ नुसार प्रसिध्द केलेली प्रारुप विकास नियंत्रण नियमावली लागू करण्याचे प्रस्तावित केले असून, सदरहू तीन क्षेत्रांचा प्रारुप विकास आराखडा व प्रारुप विकास आराखडयावरील अहवाल महानगरपालिकेने दिनांक १२ ऑक्टोबर २०१७ च्या ठराव क्र.७६१ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६(१) अन्वये जनतेकडून सूचना आणि / किंवा हरकती प्राप्त करण्यासाठी, प्रसिध्द करण्यासाठी मंजुरी दिली होती.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वयेची अधिसूचना दि.१८.१०.२०१७ च्या राजपत्रात ब दि.२४.१०.२०१७ च्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करणेत आली.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपध्दतीनुसार, विहित कालावधीमध्ये प्राप्त हरकती/सूचनांना सुनावणी देऊन त्यानुसार प्रारुप विकास योजनामध्ये करावयाचे बदल/फेरबदलांच्या सूचीसह नकाशा, विकास योजनेवरील अहवाल, बृहन्मुंबई महानगरपालिकेस दि.१५.०५.२०१९ रोजी सादर केला.

आणि ज्याअर्थी, महानगरपालिकेने दि.२४.०६.२०१९ रोजीच्या सभेत ठराव क्र.१६४ अन्वये शासकीय राजपत्रात दि.१८.१०.२०१७ रोजी प्रसिध्द झालेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये नियोजन समितीने सुचविलेले बदल/फेरबदल, नकाशा, अहवाल हयासापेक्ष महापालिकेने सुचविलेले बदल/फेरबदल इत्यादीवर मंजूरी देऊन उक्त अधिनियमाच्या कलम ३० (१) अन्वये राज्य शासनाचे मंजूरीस्तव सादर करणेचे अधिकार आयुक्तांना दिले आहेत व त्यानुसार सदर प्रारुप विकास योजना, राज्य शासनाकडे उक्त अधिनियमाच्या कलम ३०(१) अन्वये मंजूरीसाठी सादर केली आहे.

महापालिकेने दि.२४.०६.२०१९ च्या सभेत ठराव क्र.१६४ अन्वये मंजूर केलेली प्रारुप विकास योजना निव्वळ जनतेच्या माहितीकरिता portal.mcgm.gov.in>wards>Department> Chief Engineer (Development Plan)> Docs>3SPA (Bandra-A Block Parighkhari & ODC>DP U/s.28(4) वर उपलब्ध आहे.

Dgope
06/07/19
ChE(DP)

**महानगरपालिका आयुक्त** ३९२
**बृहन्मुंबई महानगरपालिका**

D:\DP-8-2018\Daftardar saheb\Tippani.docx-37

**MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI**

NOTIFICATION

No.ChE/10556/DP/Revision

**Publication of Draft Development Plan of three areas transferred from MMRDA to MCGM u/s.28(4) of Maharashtra Regional Town Planning Act,1966.**

The Municipal Corporation of Greater Mumbai is the Planning Authority for jurisdiction of Greater Mumbai as per the provision Maharashtra Regional And Town Planning Act, 1966, herein after referred as the said Act. By provisions of section 40 of the said Act, MMRDA is Special Planning Authority for the aforesaid area. The Urban Development Department of Government of Maharashtra vide its Notifications directed to exclude the three areas from MMRDA SPA area and include it in MCGM limits. Following are the description of three areas:-

| Sr. No. (1) | Details of Area (2) | No.and date of Notification (3) | Area in Hectares (4) | Municipal ward (5) |
|---|---|---|---|---|
| 1 | Area between Mithi river and L.B.S.Marg from the notified area of Bandra Kurla Complex , Kurla (W). | TPB/4314/130/ CR-42/2014/UD-11 dtd.30.08.2014 | 27.36 Ha. as per Notification and as per existing land use and GIS 35.13 Ha. | L |
| 2 | The area of 'A' Block from the notified area of Bandra Kurla Complex, Bandra(W). | TPB/4314/1468/ CR-30/2015/UD-11 dtd.18.11.2015 | 47.37 Ha. as per Notification and as per existing land use and GIS 66.56 Ha. | H/W |
| 3 | The area on the west side of S.V.Road from the notified area of Oshiwara District Centre. | TPB/4313/658/ CR-116/2014/UD-11 dtd.18.11.2015 | Not mentioned in the Notification and as per existing land use and GIS 36.50 Ha. | K/W And P/S |

Hereinafter above three areas referred as 'the three areas'

Whereas by the provisions of said Act-

(1) Municipal Corporation *vide* its Resolution No.894, dated 30th August 2016 has declared the intention to prepare Development Plan of newly included three area in M.C.G.M. limits. The same was published in the *official gazette* and local newspapers on dated 29th September 2016, as required under sub section (1) of section 23.

(2) Municipal Corporation of Greater Mumbai, as per the provisions of section 25 of the said Act, has prepared Existing Land Use Plan and published the Existing Land Use Plan of the three areas on M.C.G.M. portal for the information of the general public on 27th March 2017.

And whereas, Municipal Corporation vide its Resolution 761, dated 12th October 2017 have accorded sanction to Draft Development Plan of the three areas, Draft Development Control Regulations 2034 sanctioned earlier by Corporation vide its Resolution No.307, dated 27th May 2016 proposed to be adopted in order to have cohesive Development Plan of city and the Draft Development Plan Report of three areas, as required under section 26(1) of the said Act.

And whereas the notification U/s.26(1) of said Act was published in Government Gazette on 18.10.2017 & in local newspapers on 24.10.2017.

And whereas as stipulated under said Act, after considering the suggestions/objections to the said Draft Development Plan received within stipulated t me period, the Planning Committee has submitted then report on Draft Development Plan along with modification Table with plans to Corporation on 15.05.2019.

And whereas the Corporation vide its Resolution No.164 dt.24.06.2019 sanctioned and empowered the Municipal Commissioner to obtain the sanction of State Government to the Draft Development Plan along with the modifications, plans, report of Planning Committee along with the modification suggested by Corporation to submit the above to State Government for sanction U/s. 30(1) of the said Act & accordingly the Draft Development Plan is submitted for its sanction to State Government U/s.30(1) of MR & TP Act,1966.

The Draft Development Plan sanctioned by Corporation on 24.06.2019 vide Resolution No.164 is available for public only for the information purpose at following location:-

Portal.mcgm.gov.in>wards & Developments>Chief Engineer (Development Plan)>Docs>3SPA (Bandra-A Block Parighkhari & ODC>DP U/s.28(4).

**Municipal Commissioner**
**Municipal Corporation of Greater Mumbai**

dype
06/07/19
ChE(DP)

D:\DP-8-2018\Daftardar saheb\Tippani.docx-39